(वितरण आदेश क्रमांक-५)

सन २०१७-२०१८ या वर्षासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रम (TSP) व आदिवासी क्षेत्राबाहेरील घटक कार्यक्रमाकरिता (OTSP) निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः मजिअ - २०१७/प्र.क्र. १३६/योजना-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १३ ऑक्टोबर, २०१७

वाचा :- १) केंद्रिय ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे क्र.जे१२०२५/०१/२०१७-आरएल (एनआरएलएम_१२बी), दिनांक २५ एप्रिल, २०१७ चे वितरण आदेश.

२) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. बीयुडी-२०१७/प्र.क्र. २३/कार्यासन.६, दिनांक २८ सप्टेंबर, २०१७

३) आदिवासी विकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. बीयुडी-२०१७/प्र.क्र. २३/कार्यासन-६, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, (NRLM) अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रम (TSP) केंद्र हिस्सा या योजनेकरिता पहिला हप्ता म्हणून रु.१६६९.८० लाख इतका निधी वितरीत केलेला आहे. राज्याच्या एकत्रित निधीमध्ये सदर निधी जमा झालेला आहे. त्यामुळे सदर केंद्र निधी रु.१६६९.८० लाख, समरुप राज्य हिस्सा रु.१११३.२० लाख असे एकूण रु. २७८३.०० लाख वितरित करणे आवश्यक आहे परंतू सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रमाकरिता (TSP) केंद्र हिश्याकरिता रु.१६३८.००० लक्ष व समरुप राज्य हिस्सा रु.१०९२.०० लक्ष तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील घटक कार्यक्रमाकरिता (OTSP) रु.१०९.०० लक्ष असा एकूण रु.२८३९.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पीत केलेला आहे. वित्त विभागाने मान्यता दिल्यानुसार तसेच आदिवासी विकास विभागाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये व दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता दिल्यानुसार एकूण रु.२७३०.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

१. सन २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रम (TSP) केंद्र हिस्सा (२५०१ २९६२) व समरुप राज्य हिस्सा (२५०१ २७९३) व आदिवासी क्षेत्राबाहेरील घटक कार्यक्रमाकरिता (OTSP) (२५०१ २८०१) केलेल्या तरतूदीतून एकूण रु.२७३०.०० लाख (रु. सत्तावीस कोटी तीस लाख फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (B.D.S) द्वारे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानास वितरीत करण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अतिरिक्त संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सुपूर्द करण्यात येत आहे.

३. सदर कार्यक्रमाकरिता रक्कम रु.१६३८.०० लाखाचा खर्च "मागणी क्र.टी - ५, २५०१, विशेष ग्रामविकास कार्यक्रम, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०१, एकात्मिकृत ग्रामविकास कार्यक्रम, ७९६,

जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (०७) महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजिविका अभियानासाठी वित्तीय सहाय्य (TSP) (केंद्र हिस्सा), (२५०१ २९६२) ३३-अर्थसहाय्य " या लेखाशिर्षाखाली सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामधील शिल्लक रु.८२.४८ लाख इतका निधी आणि सन २०१७-२०१८ या वर्षाकरिताचा रु.१५५५.५२ लाख असा एकूण रु.१६३८.०० लाख तसेच रु.१०१५.७० लाखाचा खर्च "मागणी क्र.टी - ५, २५०१, विशेष ग्रामविकास कार्यक्रम, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०१, एकात्मिकृत ग्रामविकास कार्यक्रम, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (०४) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (TSP) (राज्य हिस्सा), (२५०१ २७९३) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली तसेच रु. ७६.३० लाखाचा खर्च "मागणी क्र.टी - ५, २५०१, विशेष ग्रामविकास कार्यक्रम, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०१, एकात्मिकृत ग्रामविकास कार्यक्रम, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०२) जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०२) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (OTSP), (२५०१ २८०१) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-२०१८ मध्ये अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदी मधून भागवावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशीर्षनिहाय / उपलेखाशीर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावे.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणाऱ्या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

६. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

७. हे अनुदान ज्या प्रयोजनाकरीता मंजूर करण्यात आलेले आहे, त्याच प्रयोजनाकरीता खर्च करण्यात यावे. अन्यथा ती वित्तीय अनियमितता समजण्यात येईल, याची अमंलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

८. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेले अनुदान कोषागारातून काढल्यानंतर पुढील माहिती त्वरीत लेखाधिकारी कार्यासन क्रमांक योजना-२, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, यांचे कडे पाठवावी. १) मंजूर केलेली रक्कम, २) कोषागारातून काढलेली रक्कम, ३) रक्कम काढल्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक, ४) महालेखापाल कार्यालयातील रक्कमेशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र.

९. सदर शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक्र दिनांक २० एप्रिल, २०१६ व दिनांक १८ एप्रिल, २०१७ अन्वये दिलेल्या केंद्र पुरस्कृत योजनांसाठी निधी तसेच राज्य शासनाचा समरुप हिस्सा प्रशासकीय

विभागांने त्यांचे स्तरावर वितरित करण्याच्या प्रदान केलेल्या अधिकारानुसार तसेच वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३९०/२०१७/व्यय-१५, दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ आणि अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२४/अर्थ-१९, दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१३१७२०१६९३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2017.10.13 17:09:17 +05'30'

(अनिल काळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (पाच जादा प्रतींसह)
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५ वा मजला, दक्षिण विंग (एसबीआय साईड), सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
३) अतिरिक्त संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५ वा मजला, दक्षिण विंग (एसबीआय साईड), सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
५) उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.
६) कक्ष अधिकारी (का. ६ / का.१७) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) वित्त विभाग (व्यय-१५) व (अर्थ-१९) मंत्रालय मुंबई-३२.
८) कार्यासन अधिकारी, वित्त-७, वित्त-१, योजना-२ व योजना-७, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
९) निवडनस्ती.